ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-IV July – August 2021

# राष्ट्राच्या आर्थिक आणि उत्पादक मनुष्यबळ विकासात शिक्षणाची भूमिका: एक समन्वयात्मक अर्थचक्र

**डॉ. मनिषा श्रीराम चौधरी**

**सहयोगी प्राध्यापक**

**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक**

***सारांश***

***व्यक्तीच्या व पर्यायाने देशाच्या उत्पादनात क्रमशः वाढ होणे हा आर्थिक विकासाचा सर्वसामान्य अर्थ होय. राष्ट्राच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या किंमतीत जी भर पडते त्यावरुन आर्थिक विकास मोजला जातो. राष्ट्राच्या आर्थिक विकासाशी निगडीत असे अनेक घटक असतात. उदा. परिश्रम शक्तीची रचना व वाटणी, उत्पादनाची यंत्रणा, तिची मालकी व कार्यपध्दती, रोजगार अवस्था आणि अर्थव्यवस्थेतील परिवर्तनाची दिशा या प्रमुख घटकांशी आर्थिक विकास निगडीत असतो. आर्थिक विकासासाठी भांडवल निर्मिती व्हावी लागते. परंतू आतापर्यंत मानवाव्यतिरिक्त अन्य घटकांना अधिक महत्व दिले जात होते. परंतु आज अर्थशास्त्रज्ञांचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. त्यामुळे प्रशिक्षित मनुष्यबळ ही आर्थिक विकासाला गती देणारी महत्वाची शक्ती आहे. असा त्यांनी निष्कर्ष काढला आहे. त्यामुळे आज शिक्षण आणि अर्थशास्त्र यांचा जो परस्परसंबंध येत चालला आहे. तो याच मुद्यामुळे मानवी शक्तीचे महत्व पटल्यामुळे मानवावरील गुंतवणूकीवर अर्थशास्त्र भर देऊ लागले आहे. शिक्षण ही एक उपयोगाची वस्तू आहे. आणि शिक्षणात केलेली भांडवलाची गुंतवणूक आवश्यक असली तरी ती अनुत्पादक आहे असा एकेकाळी समज होता. परंतू तो आता मागे टाकण्याची वेळ आली आहे. कारण, शिक्षणावर केलेली गुंतवणूक अनुत्पादक तर नसतेच, उलट उत्पादन वाढीसाठी ती आवश्यक असते असा अर्थशास्त्रज्ञांचा संशोधनाचा अलिकडील निष्कर्ष आहे. त्यादृष्टीने वर्तमान काळात राष्ट्रीय स्तरावर विविध मुलभूत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रम राबविले जात आहेत. अर्थातच, मनुष्यबळाची कौशल्य विकासातून उत्पादन क्षमता वाढते आणि त्यातून व्यक्तिगत विकास होण्याबरोबर राष्ट्रीय विकासही साधला जातो. हे शिक्षण आणि आर्थिक विकासाचे परस्परावलंबन राष्ट्रीय विकासाला सहाय्यभूत ठरते.***

CC BY

*Aarhat Publication & Aarhat Journals*is licensed Based on a work at*http://www.aarhat.com/eiirj/*

**मुख्य संबोध :** राष्ट्रीय विकास, आर्थिक विकास, उत्पादक मनुष्यबळ, मनुष्यबळ विकासाचे धोरण आणि शिक्षण, मनुष्यबळ विकासाचे नियोजन, शैक्षणिक नियोजकाची भूमिका

- **प्रस्तावना**

शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा संबंध रचनात्मक दृष्टीने इतका जवळचा आहे की, त्याबाबत कोणाचेही मतभेद असू नयेत. शासनसंस्था, राजकीय नेते, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ, आर्थिक नियोजनाचा प्रवर्तक या सर्वांनाच हे मान्य आहे. तरी सुध्दा शिक्षणाच्या पुनर्रचनेत अविकसित देशांच्या आधुनिकतेच्या आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात योग्य हक्क दिला जात नाही. हे एक कटू सत्य आहे. भारताबाबत तर हे विशेषत्वाने जाणवत होते. परंतू भारत सरकारने नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षणाच्या विकासाला अग्रहक्क दिला आहे. ही देशाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय

महत्वाची वाटचाल आहे. शिक्षणाचा प्रसार ज्या प्रमाणात होईल त्याप्रमाणात आर्थिक विकास होत राहणार आहे. कुशल कामगारावरच औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन अवलंबून असते. शिक्षण व उत्पादन यांचाही संबंध आहे. म्हणून व्यावसायिक व कौशल्य निर्मिती शिक्षणावर भर देणे काळाची गरज आहे. यामुळे आपोआपच उत्पादक व कुशल मनुष्यबळ वाढले की त्याचा फायदा आपोआपच राष्ट्राच्या आर्थिक विकासात होणार आहे. हे एक प्रकारचे शिक्षण आणि आर्थिक विकासाचे समन्वयात्मक अर्थचक्र आहे.

- **शिक्षण आणि आर्थिक विकासाचा समन्वयात्मक संबंध**

शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा अभ्यास करतांना जॉन मेडीसन, डेनीसन, वेझी, शूल्टस, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव अशा अनेक मान्यवरांनी शिक्षण व आर्थिक विकास यांचा संबंध दर्शविला आहे. हा संबंध अभ्यासात खालील दोन पध्दतींनी दर्शविला जातो. 1) Longitudinal 2) Cross Section.

Longitudinal पध्दतीत अनेक प्रकारे किंवा तुलनेमधून शिक्षण व आर्थिक विकास यांचा संबंध अभ्यासला जातो. तर Cross Section या पध्दतीने विशिष्ट देशाच्या विशिष्ट कालखंडामधील शैक्षणिक प्रगती आणि आर्थिक विकास या संबंधी माहिती गोळा करुन अभ्यास करतात. Bowman ने नेदरलेंडच्या अभ्यासामध्ये शिक्षण व आर्थिक विकास यांचा अभ्यास केला व त्यामधून सिध्द केले की, शिकलेल्या लोकांचे दरडोई उत्पन्न जसे जास्त आहे, त्याचबरोबरच शिकलेल्या कामगारांची उत्पादनक्षमता देखील अधिक आहे. परिणामत: राष्ट्रीय उत्पादनात वाढ दिसून येते. त्याच प्रमाणे खालील मुद्दांच्या आधारे ही हा संबंध स्पष्ट करता येईल.

**1) आर्थिक विकासातील शिक्षणाचे आद्यस्थान -**

शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा संबंध प्रत्यक्ष आणि अन्योन्य वाटतो. तो तात्पुरता आहे असे म्हणता येणार नाही. देशाचा आर्थिक विकास हा शैक्षणिक विकासाखेरीज होईल याची शक्यतासुध्दा कल्पनेत आणणे हे कठीण वाटते. दुर्दैवाने शिक्षण आणि शिक्षण संस्थांच्या कार्याचे परिणाम इतके दूरगामी आणि काळाच्या दृष्टीने लांब पल्ल्याचे असतात की, आर्थिक विकासातील शिक्षणाचे हे आद्यस्थान कित्येकांच्या चटकन ध्यानात येत नाही.

**2) वरच्या दर्जाचे यांत्रिक व तांत्रिक शिक्षण –**

शिक्षण संस्थांची रचना, ध्येय, शिक्षणाचा आशय आणि मागासलेल्या राष्ट्रातील संभाव्य आर्थिक प्रगती यांचे परस्पर संबंध अनेक प्रकारांनी दाखविता येईल. यंत्रतंत्रप्रधान समाज आणि तडफदार बुध्दिमान नोकरशाहीने सुसज्ज असलेली राज्ययंत्रणा या दोन मूलभूत घटकांच्या अभावी आर्थिक विकासाची भाषासुध्दा बोलणे अशक्य आहे. नियोजनाचा घाट जसा व्यापक अर्थाने स्वदेशी तज्ज्ञांची पाहिजे असा आपण आग्रह धरला तर या घटकांचे मोल आणखीच वाढते. कापडधंदा, कोळसा, मेगनीज सारख्या खाणी, तेल कारखाने, लोखंड-पोलाद या सर्व वस्तूंच्या उत्पादनासाठी एका वरच्या दर्जाचे तांत्रिक शिक्षण आवश्यक आहे.

**3) कृषी शिक्षणाचे आर्थिक नियोजन –**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतातील शेत जमीनीचे धुपनिवारण, सेंद्रिय खते, नवीन जातीची बी-बियाणे, जमीनीचे रसायनशास्त्र, गुरांचे रोग, शेतीचे अर्थशास्त्र, शेतकऱ्यांना आर्थिक आणि इतर ज्ञान आणि सेवा देणाऱ्या संस्था या सर्वामागे शेती विद्यापीठाचे जाळे पसरावे लागणार आहे. अर्थ, व्यापार आणि उदयोगधंदा या तीन सरकारी खात्यांच्या आर्थिक नियोजनाचा प्राथमिक आराखडा सुध्दा अद्ययावत शिक्षणाशिवाय करता येणार नाही.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July - August 2021

**4) विविध विषयातील संशोधन** –

यामध्ये पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, समुद्रशास्त्र इ. शास्त्रांमधील मुलभूत संशोधनावरच अणू विकास आणि त्यांच्या अनंत विकासाच्या शक्यता अवलंबून आहेत. वैद्यकिय शिक्षणाचा सर्वांगिण प्रसार झाल्याखेरीज सर्वसाधारण जनतेचे आयुर्मान सुधारणार नाही. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र यामधील संशोधन, पत्रकार, न्यायखाते, सार्वजनिक आरोग्य, बँका आणि उदयोगांच्या संघटना, हिशोब व्यवस्था यातील प्रत्येकामागे शिक्षणाची एक दर्जेदार पातळी आपल्याला अभिप्रेत धरावी लागेल. त्याशिवाय या खात्यांची गुणवत्ता वाढू शकणार नाही.

**5) शिक्षण व्यवस्थेचे आधुनिकीकरण** –

आर्थिक दृष्टया मागे असलेल्या कोणत्याही देशाला विकासाकडे झेपावणारे उड्डाण शिक्षणक्षेत्रातील भरीव सुधारणा खेरीज करता येणार नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद या प्रेरणा जबरदस्त असल्या तरी त्यांचे आव्हान सातत्याचेच असते असे नाही. उदा. 1971 साली बांगलादेशाच्या मुक्ती संग्रामाने एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले होते. परंतू त्यानंतरच्या 4-5 वर्षानंतर भारताच्या आर्थिक विकासाचा गाडा कसा घसरत गेला होता हे आपण अनुभवले आहेच. तेव्हा खरी कसोटी ही असते की, विकासाची गती कायम कशी राखवयाची? राष्ट्रीय आशा-आकांक्षा आणि अभिमान यांनी समाज सतत कार्यशील कसा ठेवावयाचा? शिक्षण व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाने हे करता येईल असे याचे एक उत्तम उत्तर आहे.

**6) शिक्षणातून समर्थ मनुष्यबळाची निर्मिती** –

ॲडम कॅरेल हे तज्ज्ञ ज्यांना 'आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमुळे संक्रमणावस्थेत निर्माण होणाऱ्या समस्या' म्हणतात, त्यांनाही शिक्षणाने पात्र झालेले अधिकारी तोंड देऊ शकतात. कारण त्या समस्यांचे स्वरुप गुंतागुंतीचे असते. कुशल संघटकाला ही सुजाण दृष्टिसुध्दा प्रगल्भ शैक्षणिक संस्कारातून प्राप्त होत असते. 'जनमानसावर होणारे व्यापक संस्कार किंबहूना विचाराला आणि सृजनशिल निर्मितीला चालना देणाऱ्या सर्व गोष्टी म्हणजे शिक्षण' ही शिक्षणाची व्याख्या असेच सांगते की, आर्थिक विकासाला आवश्यक असलेले समर्थ मनुष्यबळ शिक्षणसंस्थाच निर्माण करु शकतात. उदा. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स या देशातील हॉवर्ड, बर्कले, ऑक्सफर्ड, कॅंब्रिज, न्युयोर्क इ. विद्यापीठांच्या कित्येक वर्षांच्या परंपरेमुळेच तिकडे मध्यम वर्ग, प्रज्ञावंत संचालक आणि नेते इ.ची एक अखंड परंपरा निर्माण झाली आहे. अशी इतिहासाची साक्ष आहे.

**7) शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा रचनात्मक दृष्टीने घनिष्ठ संबंध** –

शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा संबंध रचनात्मक दृष्टीने इतका जवळचा आहे की, त्याबाबत कोणाचेही मतभेद असू नयेत. शासनसंस्था, राजकीय नेते, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ, आर्थिक नियोजनाचा प्रवर्तक या सर्वांनाच हे मान्य आहे. तरी सुध्दा शिक्षणाच्या पुनर्रचनेत अविकसित देशांच्या आधुनिकतेच्या आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात योग्य हक्क दिला जात नाही. हे एक कटू सत्य आहे. भारताबाबत तर हे विशेषत्वाने जाणवत होते. परंतू भारत सरकारने नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षणाच्या विकासाला अग्रहक्क दिला आहे. ही देशाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची वाटचाल आहे.

**8) शिक्षणामुळे उत्पादनात वाढ** –

निरक्षर व्यक्तीपेक्षा साक्षर व्यक्ति आपल्या उत्पादनात निश्‍चित वाढ करु शकते. आशियाई विकास बँकेने केलेल्या संशोधनावरुन सिध्द झाले आहे. म्हणून शिक्षणाचा प्रसार ज्या प्रमाणात होईल त्याप्रमाणात आर्थिक विकास होत राहणार आहे. कुशल कामगारावरच औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन अवलंबून असते. शिक्षण व उत्पादन यांचाही संबंध आहे. म्हणून व्यावसायिक व कौशल्य निर्मिती शिक्षणावर भर देणे काळाची गरज आहे. साहजिकच उत्पादनाच्या वाढीमुळे देशाच्या विकासास चालना मिळते.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July - August 2021

- **आर्थिक विकासाच्या दरवाढीत शिक्षणाचे योगदान**

| क्र. | आर्थिक विकासाचा कालखंड | शिक्षणाचे योगदान (दर) |
|---|---|---|
| 1 | 1941 ते 1955 | 14 % |
| 2 | 1956 ते 1961 | 10% |
| 3 | 1962 ते 1969 | 09% |
| 4 | 1970 ते 1977 | 25% |
| 5 | 1978 ते 1985 | 15% |
| 6 | 1986 ते 1992 | 11% |
| 7 | 1993 ते 2000 | 19% |
| 8 | 2001 ते 2007 | 26% |
| 9 | 2008 ते 2015 | 29% |

वरील वरील सर्व विचार केला असता भारतामधील शिक्षणाचे वेगवेगळया कालखंडामधून आर्थिक विकासाच्या दरवाढीत किती योगदान आहे हे आपल्या लक्षात सहज येईल.

- **मनुष्यबळ विकासाचे धोरण आणि शिक्षण**

राष्ट्रीय तसेच खाजगी क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी माणूस हाच घटक महत्वाचा असल्यामुळे माणसातील सर्वंकष सामर्थ्याची जाणीव पूर्वक अभ्यास करावयास पाहिजे. देशातील उत्पादनवाढ व कोणत्याही उदयोगधंदयाची कार्यक्षमता ही मानवाच्या कर्तुत्वावरच अवलंबून असते. म्हणून व्यक्तिमध्ये असणारे गुण, सामर्थ्य आणि कौशल्य यांचा शोध घेऊन त्यांचा योग्य उपयोग करुन घेण्याचा प्रयत्न म्हणजे मनुष्यबळ विकास होय. ज्या देशात गुणवत्ताधारक मनुष्यबळाचा विकास जास्त होईल त्या देशाची आर्थिक प्रगती जरुर होईल. म्हणून आजच्या काळात मनुष्यबळाचा विकास करणे आवश्यक आहे.

देशातील उत्पादन वाढीतून आर्थिक भरभराट होण्यासाठी शिक्षणाची खूपच गरज आहे. यासाठी शिक्षणाचा योग्य पध्दतीने प्रसार करणे गरजेचे आहे. कारण उच्च प्रतीचे शिक्षण व कुशल मनुष्यबळातूनच आर्थिक विकास होत असतो. वौज्ञानिक, तांत्रिक शिक्षणातूनच वैज्ञानिक तंत्रज्ञ व कुशल कामगार निर्माण होत असतात. शेतकरी जर सुशिक्षित असेल, कारखान्यातील कामगार सुशिक्षित व कुशल असले तर त्याचा परिणाम आर्थिक उत्पादनावर निश्चितच होत असतो. म्हणून मनुष्यबळ विकासाचे धोरण आखणे महत्वाचे आहे.

भारतात ग्रामीण भागात भरपूर मनुष्यबळ आहे. त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यांच्या शक्तीचा व बुध्दिचा वापर आर्थिक भरभराटीसाठी करुन घेणे काळाची गरज आहे. या मनुष्यबळाला विज्ञान, तंत्रज्ञान व शेतीचे उच्च कौशल्य व तंत्र देऊन व्यावसायीक सुबकता आणणे गरजेचे आहे. मनुष्यबळावरच कोणत्याही राष्ट्राचे आर्थिक स्वास्थ्य अवलंबून असल्यामुळे मनुष्यातील कौशल्य क्षमता वाढविली पाहिजे. म्हणून मनुष्यबळ विकासाचे धोरण आखणे महत्वाचे आहे.

- **मनुष्यबळ विकासाच्या धोरणातील प्रमुख घटक**

1) औपचारीक शिक्षणाचा प्रसार.
2) अनौपचारीक शिक्षणाचा प्रसार.
3) कौशल्य निर्मितीसाठी प्रशिक्षण.
4) आत्मप्रेरणेतून स्वयंविकास.

5) आरोग्यविषयक सुधारणा.

6) औपचारिक, अनौपचारीक व सांस्कृतिक उपक्रम.

7) प्रोत्साहन व प्रेरणासंबंधी विविध उपक्रम.

8) प्रत्यक्ष कार्य करीत असलेल्या लोकांसाठी, त्यांच्या कामाचा दर्जा सुधारण्यासाठी मनोरंजनातून विकासात्मक उपक्रम.

9) उत्पादनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये असणारे मानवी बळ किती यांची संख्या निश्चित करणे.

10) सकस आहारासंबंधीचे उपक्रम.

11) दारिद्रय व बेकारीच्या निर्मुलनासाठी प्रयत्न/उपक्रम.

12) स्त्री-पुरुष समानता.

- **मनुष्यबळ विकासाचे नियोजन**

कोणत्याही देशाचा आर्थिक, औदयोगिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास हा तेथील मनुष्यबळाच्या विकासावरच अवलंबून असतो. म्हणजेच मानव राष्ट्राची बहुमोल संपत्ती आहे. त्यामुळे त्याचे जनत करणे आवश्यक आहे. त्याचे नीट संगोपन व्हायला हवे, त्याचा विकास साधला पाहिजे. त्या मानवी संपत्तीचा उपयोग कशा प्रकारे केला जातो. त्यावरच राष्ट्राची प्रगती व विकास अवलंबून असतो. त्यासाठी मनुष्यबळाचे नियोजन आवश्यक आहे.

प्रत्येक देशामध्ये मनुष्यबळ विकासाचे नियोजन दुर्दैवाने केले जात नाही. असे याचे नियोजन केले नाही तर निरुद्योगी घटक म्हणून राहतो. परिणामत: बेरोजगारी वाढते. बेरोजगारीमुळे अनेक अपप्रवृत्ती वाढतात. त्यासाठी मानवी बळ विकासाच्या योजना आखल्या गेल्या पाहिजेत.मनुष्यबळाच्या विकासासाठी नियोजन आवश्यक आहे. एकीकडे बेकारी व दुसरीकडे एका विशिष्ट घटकासाठी पात्र उमेदवार मिळत नाही.

स्थूल मानाने मनुष्यबळाचे दोन प्रकार पडतात. 1) सामान्य कौशल्य धारण करणारा. 2) विशिष्ट कौशल्य धारण करणारा.

- **मनुष्यबळ विकासाच्या नियोजनाच्या पध्दती**

मनुष्यबळ विकासाच्या नियोजनासाठी एकूण पाच पध्दती वापरल्या जातात. त्या खालील प्रमाणे आहेत.

**1) सामाजिक मागणीची पध्दत -**

या पध्दतीमध्ये शिक्षण हे (Social Demand Approach) समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन म्हणून देशातील घटनेच्या सामाजिक तरतुदींची व मूल्यांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ हा दृष्टीकोन ठेऊन नियोजन करतात. उत्पादन क्षेत्रामध्ये आवश्यक असणारे तंत्रज्ञ, कारागीर, उदयोजक तसेच इतर क्षेत्रांमध्ये यांची किती आवश्यकता आहे. याप्रमाणे शिक्षण प्रक्रियेचे नियोजन केले जाते. त्याच प्रमाणे समाजपरिवर्तनाचे एक साधन हा उद्देश डोळयासमोर ठेऊन भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शिक्षण एक सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचे साधन या दृष्टीने देखील शिक्षणाचे नियोजन आखले जाते. अशा तज्हेने या पध्दतीमध्ये सामाजिक आशय महत्वाचा मानून नियोजन केले जाते.

**2) प्राप्तीदर पध्दत** –

या पध्दतीमध्ये शिक्षणामधील गुंतवणूक व त्यापासून मिळणारा मोबदला याचा खर्च व फायदा विश्लेषण पध्दतीने शिक्षणाच्या गुंतवणूकीवर होणाऱ्या मोबदल्याचा अंदाज बांधला जातो. त्याप्रमाणे नियोजनाचे विश्लेषण केले जाते. ही पध्दत खर्च व मोबदल्याचे अदययावत आकडे उपलब्ध असल्याशिवाय आमलात येत नाहीत. परिणामत: भारतासारख्या देशात या पध्दतीचा वापर करता येत नाही. कारण प्रत्येक वेळी मागील खर्चाचा हिशोब ठेवता येत नाही.

**3) मनुष्यबळाच्या मागणीनुसार नियोजन पध्दत -**

या पध्दतीत उत्पादनासाठी सामाजिक क्षेत्रात भावी काळामध्ये किमान 15 वर्षे यात कोणकोणते मनुष्यबळ लागणार यासंबंधीचे भाकीत आवश्यक असतात. ही पुढील 15 वर्षाची मागणी लक्षात घेऊनच नियोजन केले जाते. उत्पादन व सामाजिक क्षेत्रामध्ये असलेली मागणी (भाकीत) व आत असलेले मनुष्यबळ यांचा साकल्याने विचार करुन नियोजन केले जाते. या पध्दतीमध्ये मनुष्यबळासंबंधी अद्ययावत सांख्यिकीय माहिती असावी लागते.

**4) ध्येयवादी नियोजन पध्दत –**

ही विशिष्ट लक्ष्य ठेऊन शिक्षणाची केलेली नियोजनाची पध्दती आहे. या पध्दतीमध्ये शिक्षणासंबंधी विशिष्ट लक्ष्य, ध्येय ठरविली जातात. अर्थात ही ध्येये ठरवित असतांना व्यावसायिक गरजांचा देखील विचार करावा लागतो. या पध्दतीने शिक्षणाचे नियोजन केले जाते. विशेषत: प्रौढ शिक्षणाचे उपक्रम राबवितांना या पध्दतीचा वापर केला जातो. उदा. नाशिक जिल्हा एका वर्षात साक्षर करण्याची योजना याच पध्दतीने राबविली जाते.

**5) रेखीय क्रमान्वित नियोजन पध्दत –**

या पध्दतीत दोन पध्दतींचा समन्वय आहे. 1) मनुष्यबळाच्या मागणीनुसार नियोजन पध्दत. 2) प्राप्तीदर नियोजन पध्दत. शिक्षणावर होणारा खर्च हे भौतिक Input म्हणून समजले जावे. विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर हा गुणक Coefficient मानून शैक्षणिक पध्दतीचे Production Function तयार केले जाते व शिक्षणाचे नियोजन त्या निष्कर्षांच्या आधारे केले जाते. ही पध्दती बरीचशी जटील आहे.

- **मनुष्यबळ विकासासाठी शैक्षणिक नियोजकाची भुमिका**

1) शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. त्या दृष्टीने देशाच्या राजकीय विचारांशी सुसंगत अशी धोरणे राबवावी लागतात. ध्येय-धोरणांवर प्रभाव पाडणारा मुख्य घटक म्हणजे राजकारण होय.

2) शिक्षणाची ध्येय-धोरणे ठरवितांना देशामधील सामाजिक व आर्थिक परिस्थिती देखील विचारात घ्यावी लागते.

3) नियोजन करतांना ज्या पध्दतीने सामाजिक परिवर्तन करावयाचे असेल त्या परिवर्तनाशी सुसंगत अशा तऱ्हेचे नियोजन करावे लागते.

4) शिक्षणाचे नियोजन करतांना शिक्षणामधून त्या क्षेत्रामध्ये आवश्यक असणारे मनुष्यबळ निर्माण व्हावे अशी अपेक्षा आहे. त्याचबरोबर त्या मनुष्यबळाचे कुशल नेतृत्व करणारे नेते देखील त्यामधून निर्माण होतील याचे भान नियोजन करणाऱ्याने ठेवले पाहिजे.

5) नियोजन करतांना देशाची सांस्कृतिक व राष्ट्रीय अस्मिता कायम राहील याचे भान ठेवले पाहिजे.

- **संदर्भ सूची**

1. अहिरे व बोंदार्डे, (1998), शिक्षणाचे अर्थशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे
2. डॉ. शेवतेकर शारदा व निकुमे एम. डी., (2010), स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण आणि शिक्षणाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर
3. डॉ. सिंग के. एस., (2001), शिक्षा का अर्थशास्त्र, विनोद पुस्तक मंदिर, आगरा
4. डॉ. सुशील जिंदल, (2013), शिक्षा का अर्थशास्त्र, अमोल प्रकाशन, दिल्ली
5. दै. लोकसत्ता, विशेष पुरवणी, दि. 10 डिसेंबर/2010, पृ. क्र.7
6. Blaug & Mark, (2002), Economics of Education, APH Publication, Delhi
7. Maharashtra State Census of 2011 - The Maharashtra Census Directorate, Mumbai
8. www.wikipedia.org.in
9. www.maharashtra.gov.in
10. www.ecobudget.com